महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN of The Corporation
U92100MH1977SGC019882

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.
दुरध्वनी क्र. २८४० १५४४, २८४० १७५५, २८४९ ७५०० फॅक्स : २८४० ०७३४

क्र. कलागारे १/उत्पन्नवाढ दर/२७/९८/ ५८७
दिनांक - १२.११.२०२०

## कार्यालयीन आदेश.

वाचा :-१) क्र. २०१८/३४/सु.द./क.वि./१४४६, दि. ३१.१०.२०१८
२) क्र. २०१८/३४/सु.द./क.वि./३७८, दि. २९.३.२०१९
३) क्र. कं.स.का.वि./संमबै१५४/२०२०-२१/३५९८, दि.२७.१०.२०२०

महामंडळाचे उत्पन्न वाढीसाठी तसेच संदर्भाधीन दिनांक ३१.१०.२०१८ च्या आदेशातील मुद्या क्र.१२ मध्ये दि.२९.३.२०१९ चे कार्यालयीन आदेशान्वये करण्यात आलेल्या सुधारणा करण्यात आली आहे. सदर आदेशान्वये देण्यात आलेल्या भाडे सवलतीचा निर्मितीसंस्थेकडून होत असलेला गैरवापर टाळण्यासाठी आणि सुलभ कार्यपध्दती विहित करण्यासाठी संचालक मंडळाने दिनांक २२.१०.२०२० च्या बैठकीतील ठराव क्र. १५४/१० अन्वये खालीलप्रमाणे भाडे सवलत लागू करण्यास मान्यता दिली आहे. यास्तव क्र. २०१८/३४/सु.द./क.वि./३७८, दि. २९.३.२०१९ चे कार्यालयीन आदेश रद्द करण्यात येऊन पुढीलप्रमाणे भाडे सवलत लागू करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | आरक्षण कालावधी | भाडे दरात सवलत |
|---|---|---|
| १ | ३ ते ६ महिने | १० दिवस |
| २ | ७ ते ९ महिने | २० दिवस |
| ३ | १० ते १२ महिने | ३० दिवस |

तथापि सदर सवलत लागू करताना पुढील बाबीं विचारात घेण्यात येतील :-

१) ३ महिन्यापर्यंतच्या आरक्षण कालावधीसाठी कोणतीही सवलत लागू राहणार नाही. ३ महिन्यांचा आरक्षण कालावधी पूर्ण झाल्यावरच संस्था १० दिवसाच्या भाडे सवलतीस पात्र ठरेल.

**उदाहरणार्थ** (अ) :- एखादया निर्मिती संस्थेने दि.१४ नोव्हेंबर ते १० फेब्रुवारी २०२० या कालावधीसाठी आरक्षण केल्यास ३ महिने पूर्ण न झाल्याने सवलत लागू राहणार नाही. तथापि संस्थेने दि.१४ नोव्हेंबर ते १३ फेब्रुवारी २०२० या ३ महिन्याच्या कालावधीसाठी आरक्षण घेतल्यास त्यांना पूर्ण ३ महिन्याच्या आरक्षणासाठी १० दिवसाची सवलत देय ठरेल.

२) प्रथम आरक्षण नोंदविल्यानंतर आरक्षण कालावधीस मुदतवाढ वा पुन:आरक्षण केल्यानंतर एकूण आरक्षण कालावधीतील पूर्ण महिने विचारात घेऊनच देय असलेली भाडे सवलत लागू करण्यात येईल.

**उदाहरणार्थ** (ब) :- एखादया निर्मिती संस्थेने प्रथम दि.१४ नोव्हेंबर ते १३ फेब्रुवारी २०२० या ३ महिन्यांसाठी आरक्षण घेतल्यास त्यांना सदर ३ महिन्यासाठी १० दिवसाची सवलत देय ठरते. तथापि, सदर संस्थेने त्याच चित्रीकरण स्थळावर १३ फेब्रुवारी २०२० पासून/नंतर लागूनच १३ मे २०२० पर्यंत ३ महिन्याची मुदत वाढ अथवा पुन:आरक्षण नोंदविल्यास त्यांना अधिकची १० दिवस भाडे सवलत लागू न होता दि.१४ नोव्हेंबर ते १३ मे २०२० असा एकूण ६ महिन्यांचा एकूण आरक्षण कालावधी विचारात घेऊन १० दिवसांची भाडे सवलतच लागू राहील.

सदर आदेश दिनांक २३.१०.२०२० पासून चित्रनगरीत नव्याने आरक्षण नोंदविणाऱ्यांना लागू आहेत.

(मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने)

(आंचल गोयल, भा.प्र.से.)
सह व्यवस्थापकीय संचालक

प्रति-
सर्व निर्मितीसंस्था
प्रत माहितीसाठी -
१.मा. व्यवस्थापकीय संचालक,दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव, मुंबई
२.सर्व विभाग प्रमुख
३.निवड नस्ती